आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ जून २०२६ -मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- फ्रान्समध्ये जी सेव्हन परिषदेत ‘आंतरराष्ट्रीय एकजुटीची पुनर्बांधणी’ या विषयावरल्या चर्चासत्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी

- महाराष्ट्रात जूनच्या पहिल्या पंधरवड्यात केवळ २७ पूर्णांक ४ शंताश मिलीमीटर पावसाची नोंद, शेतकऱ्यांना पेरणीची घाई न करण्याचा सल्ला

- अमेरिकेबरोबरचं युद्ध संपवण्याच्या करारानुसार इस्रायललाही लेबनॉनमधून माघार घ्यावी लागेल अशी इराणची भूमिका

- डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषध विक्रीवर बंदी

- जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या दरात मोठी घसरण

**आणि**

- एफ आय एच चषक हॉकी स्पर्धेत भारतीय महिला संघ उपांत्य फेरीत

**<><><><><>**

फ्रान्समध्ये एव्हियन इथं ‘नवीन भागादारी आणि आंतरराष्ट्रीय एकजुटीची पुनर्बांधणी’ या विषयावरल्या चर्चासत्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी होत आहेत. या परिषदेत जगभरातल्या नेत्यांशी चर्चा करण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. जी सेवन परिषदेत सहभागी होण्याची प्रधानमंत्र्यांची ही तेरावी वेळ आहे.  या परिषदेत ते ग्लोबल साऊथ देशांचे मुद्दे उपस्थित करतील, त्यामुळे भारतासाठी ही महत्त्वाची परिषद आहे.

या परिषदेदरम्यान प्रधानमंत्री मोदी कॅनडा, ब्रिटन यांच्या प्रधानमंत्र्यांशी तसंच संयुक्त अरब अमिरातीच्या अध्यक्षांसोबत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. ते उद्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेन-रशिया संघर्षात लक्ष घालावं अशी इच्छा युरोपियन राष्ट्रांनी आज एव्हीयन इथं सुरू असलेल्या जी सेव्हन परिषदेत व्यक्त केली.

रशिया-युक्रेन युद्धात आपण लक्ष घालू तसंच युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी चर्चा करू असं डोनाल्ड ट्रम्प यांनी आज सांगितलं. या युद्धामुळे अमेरिकेवर फारसा परिणाम झाला नाही, असं ते म्हणाले, मात्र या युद्धात झालेल्या जीवितहानीबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केलं.

<><><><><>

महाराष्ट्रात जूनच्या पहिल्या पंधरवड्यात केवळ २७ पूर्णांक ४ शंताश मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये असा सल्ला महाराष्ट्र शासनानं दिला आहे. या पंधरवड्यात सरासरी १०३ पूर्णांक ८ शंताश मिलीमीटर पावसाची नोंद होत असते. त्या तुलनेत राज्यात कमी पाऊस पडल्याचं आज मंत्रीमंडळ बैठकीत सांगण्यात आलं. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पाऊस सुरु होण्याची शक्यता असून विदर्भ आणि मराठवाड्यात १८ जूनपासून पावसाला सुरुवात होईल. असंही बैठकीत सांगण्यात आलं. शेतकऱ्यांनी पावसाची स्थिती पाहून शेतीची कामं हातात घ्यावी असंही आवाहन करण्यात आलं आहे.

<><><><><>

राज्याच्या ग्रामीण भागातल्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर प्रभावी आणि कायमस्वरुपी उपाययोजनांवर भर देणारं महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ जाहीर करण्यात आलं आहे. आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या धोरणाला मान्यता देण्यात आली. विविध योजनांचं एकत्रिकरण करून हे धोरण राबवलं जाणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ द्यायचा निर्णय सरकारनं घेतला. त्यासाठी संबंधित अधिनियमात सुधारणा करायला मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

<><><><><>

अमेरिकेबरोबरचं युद्ध संपवण्याच्या करारानुसार इस्रायललाही लेबनॉनमधून माघार घ्यावी लागेल, असं इराणनं म्हटलं आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची म्हणाले की, इस्रायलनं दक्षिण लेबनॉनवर ठेवलेला ताबा हा अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या

सामंजस्य कराराचं उल्लंघन ठरेल. अंतिम करारात लेबनॉनचा समावेश आहे की नाही, हे अमेरिकेनं स्पष्ट केलेलं नाही, असं अराघची म्हणाले.

इस्रायलचे प्रधानमंत्री बिनामिन्य नेत्यान्यू यांनी काल या कराराला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय म्हटलं होतं. इस्रायलचे स्वतःचे प्राधान्यक्रम असल्याचंही त्यांनी म्हटलं होतं.

<><><><><>

केंद्र सरकारनं महाराष्ट्र पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी ७३३ कोटी रुपयांची योजना मंजूर केली आहे. त्यातला ६० टक्के निधी केंद्र सरकार देणार असून उर्वरित निधी राज्य सरकार देईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे. सागरी सुरक्षा, ड्रग्जविरोधी मोहीम, सायबर सुरक्षा, एआय तंत्रज्ञानाचा अधिक वापर, नागरिकांची सुरक्षा, आधुनिक शस्त्र, वाहने यासारखी गोष्टींसाठी या निधीचा वापर होईल, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

डॉक्टरच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषधासह कोणत्याही प्रकारच्या सिरपची थेट विक्री करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. यामुळं ग्रामीण भागात सुद्धा डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याची औषधं मिळणार नाहीत. औषधांची गुणवत्ता आणि रुग्णांच्या हिताचा विचार करुन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं हा निर्णय घेतला आहे. द्रवरुप औषध अर्थात सिरपच्या निर्मितीला आणि विक्रीला कायद्याच्या कठोर चौकटीत आणण्यासाठी, तसंच निकृष्ट आणि बाद झालेल्या कफ सिरपची विक्री थांबवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

<><><><><>

जागतिक बाजारपेठेत इंधन तेलाच्या दरांनी आज गेल्या ३ महिन्यातला तळ गाठला. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून इंधन तेलाची वाहतूक पूर्ववत होण्याची शक्यता लक्षात घेऊन तेल कंपन्यांनी दर कमी केले. ब्रेंट क्रूड ऑईलचे दर २ पूर्णांक ७ दशांश टक्क्यानं घसरून प्रति बॅरल ८० अमेरिकन डॉलर आणि एकोणनव्वद सेंट्स इतके झाले. वेस्ट टेक्सास इंटरमीजिएट च्या कच्च्या तेलाचे दर ३ पूर्णांक १ दशांश टक्क्यानं घसरून प्रतिबॅरल ७८ डॉलर्स २५ सेंट्सवर आले.

<><><><><>

एफ आय एच हॉकी चषक स्पर्धेत भारताच्या महिला संघानं ६ गुण मिळवून उपान्त्य फेरी गाठली आहे. न्यूझीलंडमधे ऑकलंड इथं झालेल्या उपान्त्यपूर्व सामन्यात भारतानं जपानचा २ विरुद्ध १ गोलनं पराभव केला. भारताच्या सलीमा तेटे आणि लालरेम सियामी यांनी प्रत्येकी एक गोल केला, तर जपानसाठी हिरामित्सु आई नं एकमेव गोल केला. भारतीय संघ आतापर्यंत अपराजित राहिला असून गुणतालिकेत अग्रस्थानी आहे.

<><><><><>

'कॉक्रोच जनता पार्टी'नं आज नागपुरात संविधान चौकात आंदोलन केलं. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारपर्यंत राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केली. खंजेरी वादक सत्यपाल महाराज, वर्ध्यातले शिक्षक नितेश कराळे यांच्यासह हजारो तरुण-तरुणी तसंच नागरिक या शांततापूर्ण आंदोलनात उपस्थित होते.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी शिक्षा कमी करण्याच्या उद्देशानं ब्रिटीश सरकारकडे १० वेळा दयेसाठी अर्ज दाखल केला होता, असा जबाब सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी दिला आहे. मात्र या अर्जांमध्ये फारशी नम्रता किंवा ब्रिटीशांप्रति निष्ठा दाखवण्याचा प्रयत्न नव्हता, असंही ते म्हणाले. सावरकरांच्या माफीनाफ्यासंदर्भात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भातल्या मानहानीच्या खटल्याची सुनावणी पुण्यातल्या MP/MLA न्यायालयात सुरू आहे. त्यात उलट तपासणीच्या वेळी सात्यकी सावरकर यांनी हा जबाब दिला आहे. अशाप्रकारचा दयेचा अर्ज सादर करणं कुठल्याही कैद्यांना बंधनकारक नव्हतं. त्यामुळं सावरकरांनी स्वेच्छेनं हा अर्ज केला होता, असंही सात्यकी सावरकर म्हणाले. राजगुरु, बटुकेश्वर दत्त, अश्फाकउल्ला खान यांनी अशा प्रकारचा दयेचा अर्ज केला नव्हता ,असंही ते जबाबात म्हणाले.

<><><><><>

२०१६-१७ आणि २०१७-१८ या आर्थिक वर्षांत यस बँकेच्या कर्जाच्या कथित गैरव्यवहार प्रकरणी ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयाने मुंबई, खंडाळा आणि दिल्ली इथं १७ ठिकाणी छापे टाकले. सुरक्षा ॲसेट री कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड, सुरक्षा रियालीटी लिमिटेड, ख्याती रिअल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांच्या कार्यालयावर, त्यांचे प्रवर्तक,

संचालक आणि कर्मचाऱ्यांवर तसंच यस बँकेच्या माजी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानी हे छापे टाकण्यात आले.

<><><><><>

चालू खरीप हंगामातल्या पीकस्थितीचा आढावा घेण्यासाठी  कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज नवी दिल्लीत एक उच्चस्तरीय बैठक घेतली. एलनिनोचा संभाव्य परिणाम लक्षात घेऊन कापूसउत्पादन वाढवणं, डाळींच्या बाबतीत स्वयंपूर्णता मिळवणं, तसंच कमी पावसाच्या जिल्ह्यांसाठी आधीच योजना तयार करणं या बाबींवर चौहान यांनी बैठकीत भर दिला.

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर खासदारांच्या गटाला मान्यता द्यायची की नाही हे ठरवण्याआधी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला बंडखोर खासदार आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालच्या खासदारांची भेट घेणार असल्याचं सांगितलं जात आहे.

तृणमूलच्या वीस खासदारांनी नॅशनिलिस्ट सिटीझन पार्टी ऑफ इंडियामधे सहभागी झाल्याचा निर्णय दोन दिवसापूर्वी जाहीर केला होता.

<><><><><>

अयोध्येतल्या राम मंदिराला दिल्या जाणाऱ्या देणग्या आणि दागिन्यांमधे गैरव्यवहार झाल्याच्या आरोपाचा तपास विशेष तपास पथकानं सुरू केला आहे. लखनौचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत यांच्या नेतृत्वाखालच्या या पथकात पोलीस महानिरीक्षक किरण एस. आणि अर्थ विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश आहे. या पथकानं काल अयोध्या मंदिराच्या आवाराची पाहणी केली.

<><><><><>

दार्जिलिंगच्या डोंगराळ भागातल्या गोरखा समुदायाचे बऱ्याच काळापासून प्रलंबित राहिलेले प्रश्न लवरकरच संविधानाच्या चौकटीत राहून सोडवले जातील. असं पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यानी म्हटलं आहे. ते आज दार्जिलिग जिल्ह्यात कुरसुंग इथं आयोजित जाहीर संभेत बोलत होते. गोरखालँड प्रांतातल्या प्रशासनामधल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करुन दोषीवर कठोर कारवाई करण्यात येईल असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

//<><><><><>//